१०३ वर्षांची बँकींग परंपरा...


जिथं जिव्हाळा जोपासला जातो •••

# दि वाई अर्बन को-ऑप. बँक लि., वाई

स्वातंत्र्यदिन चिरायू होवो...

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या

## हार्दिक शुभेच्छा!



# जिव्हाळा

प्रधान कार्यालय : ५९१, गणपती आळी, वाई,
ता. वाई, जि. सातारा. (४१२८०३)

- Email ID : wucb@waibank.com
- Website : www.waibank.co.in

दूरध्वनी क्र. : (०२१६७) २२०७७७, २२०८७७
मो. : ८३८००१२१८३

ही अर्धवार्षिक पुस्तिका वाई अर्बन बँकेने गुरुवार, दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी प्रधान कार्यालय, वाई येथे प्रकाशित केली.

विनामूल्य व बँक कर्मचारी प्रशिक्षण हेतू.

# संपादकीय

सस्नेह नमस्कार,

आज सन २०२४ च्या पहिल्या सहामाहीचा **जिव्हाळा** हा अंक आपल्या हाती देताना नेहमीप्रमाणेच आनंद होतो आहे. जिव्हाळा अंक प्रसिद्धीची प्रथा गेली बारा वर्षे आपण सातत्याने पाळली आहे. अंकाची गुणात्मक, दर्जात्मक तसेच आकाराची आपण प्रगती केली. परंतु आज बँकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता, व्यवस्थापक मंडळाने काटकसरीचे धोरण अवलंबले आहे. शक्य तिथे खर्च कमी करून नफा वाढविण्यासाठी हातभार लावण्याचे धोरण स्वीकारले आहे. यासाठीच आपणही थोडाफार हातभार लावावा, या उद्देशाने मा. अध्यक्षांचे बरोबर विचारविनिमय करून जिव्हाळा प्रकाशनाची प्रथा पूर्ण बंद न करता त्याचे आकारमानात आणि छपाई दर्जात कपात करण्याचा निर्णय संपादक मंडळांनी घेतला आहे.

त्यामुळेच आजचा हा अंक थोड्या पानांचा परंतु गुणात्मक दर्जा घसरू न देता प्रसिद्ध करीत आहोत. याबद्दल मनात दुःख आहेच, परंतु निदान दोन अंक या प्रकारचे प्रसिद्ध करून आम्ही या काटकसरीचे धोरणास मदतच करत आहोत.

लवकरच बँक सुपरवायझरी ॲक्शन मधून पूर्णपणे बाहेर पडेल, असा आम्हासही विश्वास आहे. आपल्या सर्वांचाच, मा. व्यवस्थापक / मा. संचालक मंडळाचे प्रयत्न आणि कर्मचाऱ्यांचे मनापासून सहकार्य यावर विश्वास आहे. आता रुपये २५ लाखाहून कमी कर्ज वाटपास सुरुवात झाल्याने आपण सर्वच आनंदित आहोत. अशीच व्यवसायात प्रगती होऊन नफा क्षमता वाढून बँक पुन्हा गतवैभवास जाईल याची पूर्ण खात्री आम्हास आहे. तूम्हीही ती बाळगावी आणि त्यासाठी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्टा करून वसुली आणि अनुत्पादीक कर्जात कमतरता येणे याच उद्देशाने सर्वजण प्रयत्नशील राहू या.

कर्मचाऱ्यांचा सहभाग या अंकाची गुणात्मक प्रगती करण्यासाठी आवश्यक आहे. आपले अनुभव बँकिंग विषयाचे लेख आमच्याकडे पाठवून सहकार्य करावे ही विनंती.

आपणा सर्वांना संपादक मंडळातर्फे **स्वातंत्र्य दिनाच्या** मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**जय हिंद, जय महाराष्ट्र, जय सहकार!**

- **संपादक मंडळ :**

बँकेचे अध्यक्ष – **मा. श्री. अनिल देव**
उपाध्यक्ष **मा. डॉ. श्री. शेखर कांबळे**
मुख्य कार्यकारी अधिकारी **मा. श्रीपाद कुलकर्णी**
प्रमुख संपादक – **मा. श्री. अविनाश जोशी**
सरव्यवस्थापक **श्री. चंद्रशेखर काळे**
उपसरव्यवस्थापक – **श्री. संतोष बागुल**
सदस्य– **श्री. प्रसाद कुंभारे, श्री. योगेश सुरत्राण, श्री. अभिजीत बोकील, श्री. संतोष क्षीरसागर.**
सहसंपादक – **श्री. मल्हारी पेटकर, सौ. माधुरी मुसळे,**





Scanned with OKEN Scanner

# मा. अध्यक्षांचे मनोगत

**– अनिल मोरेश्वर देव,** अध्यक्ष.



बँकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी, सेवक यांना माझ्यातर्फे तसेच संचालक मंडळातर्फे सस्नेह नमस्कार.

नेहमीप्रमाणे या जिव्हाळा अंकाचे प्रकाशनाच्या निमित्ताने तुम्हां सर्वांशी हितगुज करण्याची संधी प्राप्त होत आहे. याचा मला अतिशय आनंद होत आहे. दि. २१ जून २०२३ पासून नवीन संचालक मंडळाने कारभार हाती घेतला आणि त्यानंतर तुमचे सहाय्याने आपण बँकेचे अनुत्पादित कर्ज वसुलीसाठी अहोरात्र प्रयत्न केले. मला सांगायला खूप आनंद आणि अभिमान वाटतो की, अनुत्पादित कर्जे मोठया पमाणात कमी करण्याचे फार मोठे काम आपण सर्वांनी केले आहे. आता पुढच्या काळामध्ये सुद्धा यात कपात करून एनपीएची रक्कम कमी करणे अत्यंत गरजेचे आहे, यासाठी रिझर्व्ह बँक खूपच आग्रही आहे. हे आपण सर्वजण जाणताच.

आपण एनपीए वसुलीसाठी अथक प्रयत्न करीत आहोत. सर्व प्रकारचे प्रयत्न करूनही पुढील तिमाहीमध्ये खर्चात मोठी कपात करून तरतुदींचे प्रमाण कमी करू या. मात्र यासाठी नेहमीप्रमाणे तुम्हा सर्वांचे क्रियाशील सहकार्य गरजेचे आहे. आपण सर्वजण मिळून आपल्या बँकेला सुपरवायझरी ॲक्शन मधून बाहेर काढून सर्व व्यवसाय पूर्ववत करण्याचा निश्चय करू या. तुम्हास माहित आहेच की, आता या अटी शिथिल होण्यास सुरुवात झाली आहे. रिझर्व्ह बँकेने आपल्याला रुपये २५ लाखापर्यंत ची कर्जे वाटण्याची परवानगी दिली आहे.

त्यामुळे आता व्यवसायात वाढ होऊ शकेल. आपण सर्वांनी अशी कर्जे वाटपासाठी चांगले कर्जदार शोधावे आणि व्यवसाय वाढीचे प्रयत्न करावेत, ही अपेक्षा आहे. त्याचबरोबर भांडवल वाढ व ठेवीवाढ ही गरजेची आहे. खरे तर धंद्यातून नफा होऊन सुद्धा केवळ एनपीए पोटी तरतुदी कराव्या लागत असल्यामुळे आपल्याला नक्त तोटा दाखवावा लागतो आहे. ही वस्तुस्थिती बदलायची असेल तर थकीत कर्ज वसुलीस प्राधान्य देऊन नवीन खाती पुन्हा एनपीए होणार नाहीत, याची दक्षता घेणे गरजेचे आहे. यापुढील काळात जोमाने प्रयत्न करून रिझर्व्ह बँकेच्या अपेक्षा पूर्ण करून आपण गतवैभवास पात्र होऊ, असा मला व माझे संचालक मंडळ सदस्यांना पूर्ण विश्वास आहे. मात्र यासाठी तुमची साथ आणि प्रयत्न यांची नितांत आवश्यकता आहे.

वसुली प्रयत्नांबरोबरच काटकसरीचेही अनेक उपाय आपण करतो आहोत. अनावश्यक खर्चात कपात करून नफा वाढीस हातभार लावण्यासाठी संचालक मंडळ आग्रही आहे. याचाच एक भाग म्हणून यापुढील दोन जिव्हाळा अंक आपण छोटे केले आहेत. पृष्ठ संख्या कमी करून कव्हर पेज साधे केले आहे. त्यायोगे सुद्धा रक्कम वाचवून आमचे प्रयत्नास संपादक मंडळांनी मोठ्या मनाने मदत केली आहे. त्यासाठी या सर्वांचे मनापासून धन्यवाद.

गेली एक तपापेक्षा जास्त काळ सुरू असलेली जिव्हाळा अंक प्रकाशनाची प्रथा पूर्ण बंद न करता त्याचा आकार कमी करावा असे, संपादक मंडळाशी चर्चा करून ठरवले आहे. मात्र आपले ललित लेख कविता विनोद अशा गोष्टी टाळून फक्त बँक आणि बँकिंगवरील लेख यांचा समावेश असलेला छोटा अंक काढावा असा विचार झाला. परंतु मला विश्वास आहे की, पुन्हा लवकरच आपण मोठा अंक छपाईसाठी सुरुवात निश्चितच करू. कारण या अंकाचा उद्देशच मुळी प्रशिक्षण, कार्य कौशल्य वाढवणे, बँकिंगचे ज्ञान वाढवणे आणि त्याचबरोबर तुमचे साहित्य गुणांना वाव देणे, प्रसिद्धी देणे हाच आहे.

मी संपादक मंडळास सातत्यपूर्ण दर्जेदार अंक प्रकाशनासाठी आणि काटकसरीचे उपायांना हातभार लावण्याचे त्यांचे संमतीसाठी मनापासून धन्यवाद देतो. आज या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सर्व अधिकारी कर्मचारी सेवक व त्यांचे कुटुंबीयास माझी तर्फे तसेच संचालक मंडळ सदस्यांतर्फे मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा. या स्वातंत्र्यदिनी आपण सर्वजण देशात आर्थिक साक्षरता आणि जागरूकता निर्माण करून सर्वांना आर्थिक सुबत्ता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करूया.

**उत्सव तीन रंगांचा, आभाळी आज सजला.**
**नतमस्तक मी या सर्वांसाठी,ज्यांनी भारत देश घडविला.**
जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय सहकार !!!

# सहकार मंत्रालय - राष्ट्रीय सहकार धोरण मसुदा आणि सहकाराची नवी दिशा

सहकार क्षेत्रासाठी दिनांक ८ जुलै, २०२१ हा एक संस्मरणीय दिवस ठरला. कारण या दिवशी नव्याने केंद्रीय सहकार मंत्रालयाची स्थापना झाली. या मंत्रालयाची धुरा सहकाराची जाण असलेले मा. गृहमंत्री श्री. अमितभाई शहा यांनी स्वीकारली. अल्पावधीतच सहकार क्षेत्र सक्षम व समृध्द बनविण्यासाठी या मंत्रालयाने महत्वपूर्ण असे अनेक निर्णय सहकार क्षेत्रासाठी घेतले.

त्यातीलच एक निर्णय म्हणजे देशातील सहकाराबद्दलचे राष्ट्रीय धोरण निश्चित करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती दि. ०२ सप्टेंबर, २०२२ रोजी स्थापन करण्यात आली. या समितीचे अध्यक्षपद सहकारातील अनुभवी व माजी केंद्रीय मंत्री श्री. सुरेश प्रभू यांना देण्यात आले. या केंद्रीय समितीने ६६४ संघटना, व्यक्ती, तज्ञ संशोधक व प्रमुख सरकारी संस्थांचे पदाधिकारी यांच्याशी सखोल चर्चा केली. या समितीच्या एकूण १७ सभा झाल्या. या समितीमध्ये विविध सहकार क्षेत्रांतील नामवंत अशा ४८ व्यक्तींचा समावेश होता.

या समितीचे कार्यालयीन कामकाज प्रमुख म्हणून डॉ. हेमा यादव, संचालक, वैकुंठ महेता प्रशिक्षण संस्था, पुणे आणि अर्थसल्लागार तसेच कमिशनर, सहकार विभाग- उत्तर प्रदेश यांनी काम पाहिले. भारताच्या अमृत काळात (२०२३-२०४७) यामध्ये सहकार चळवळ अधिक मजबूत व समृध्द होऊन जीडीपी वाढीस त्याचा उपयोग व्हावा, तसेच संस्था संचालन अधिक जबाबदार, प्रामाणिक व पारदर्शी व्हावे, त्यांच्यात व्यावसायिकता यावी आणि सहकाराच्या सात मूलतत्वांचा अंगीकार करीत सहकार चळवळ आर्थिक स्थैर्यावर समृध्द व्हावी, तसेच सभासदांचा सहभाग व त्यांची पत वाढेल, याच शुध्द हेतूने सहकार मंत्रालयाने राष्ट्रीय सहकार धोरण तयार करण्यासाठी श्री. प्रभू यांचे अध्यक्षतेखाली ही समिती नेमली.

केंद्र सरकारचे सहकाराबद्दलचे धोरण सध्या कच्च्या मसुद्याच्या स्वरूपात आहे. ते केंद्र सरकारचे विचाराधीन असून अंतिम शिफारसी मंजूर होतील, त्याचवेळी त्यात अधिक स्पष्टता येईल. या समितीने आपला ५३ पानांचा अहवाल सर्व संमतीने केंद्र सरकारला शिफारसीसह नुकताच सादर केला आहे. त्यावर सखोल विचार होऊन सहकाराचे नवे राष्ट्रीय धोरण लवकरच केंद्र सरकार तर्फे प्रसिध्द करण्यात येईल. त्यायोगे सहकारातून समृध्दीकडे हे केंद्र सरकारचे धोरण प्रत्यक्षात येण्यास मदत होईल. परंतु हे निश्चित की, राष्ट्रीय धोरण समितीचे अहवालाचा मसुदा वाचल्यानंतर त्यातील शिफारसी या सहकार क्षेत्रांत आमूलाग्र बदल घडवून तो सक्षम व समृध्द बनविण्यासाठी निश्चितच उपयोगी पडतील.

ही समिती नेमताना असे स्पष्ट करण्यात आले होते की, गेल्या १२० वर्षांपासून सुरू असलेली सहकाराची सात मूलतत्वे अबाधित राहतील व त्यावर नवे राष्ट्रीय सहकारी धोरण आधारित असेल. समितीच्या या ५३ पानी मसुद्यामध्ये परिच्छेद १५ मध्ये या समितीची उद्दिष्ट्ये अधोरेखित करण्यात आली आहेत. परिच्छेद १६ मध्ये विविध विभागांत कोणत्या विषयांवर विवेचन व शिफारसी आहेत, याची माहिती देण्यात आली आहे. अशा एकूण ११ विभागांत हा मसुदा विभागण्यात आला आहे. परिच्छेद १७ मध्ये विविध प्रकारच्या विषयांवरील समितीच्या शिफारशी एकमताने देण्यात आल्या आहेत. त्या केंद्र सरकारने स्वीकाराव्यात, अशी शिफारस करण्यात आली आहे.

सहकार चळवळीला १२० वर्षांचा गौरवशाली इतिहास आहे. भारतात जवळजवळ ८.५ लाख सहकारी संस्था असून त्यात पतसंस्था व सहकारी बँका याशिवाय ८० टक्के सहभाग हा विविध उद्योगांतील सहकारी संस्थांचा आहे. सहकारी क्षेत्रांत आज मत्स्योद्योग, दुग्ध व्यवसाय, घरबांधणी, मार्केटिंग व सेवा क्षेत्र, विविध उत्पादन करणारे उद्योगधंदे, दळणवळण, शेती, कुक्कुटपालन अशा अनेकविध संस्था आज सहकारी तत्वावर चालविल्या जात आहेत.

या सर्व संस्थांची वाढ सशक्त व समृध्द संस्थांमध्ये व्हावी, हाच राष्ट्रीय सहकारी धोरणाचा उद्देश आहे. या सर्वांसाठी प्रशिक्षित व कार्यकौशल्य असणारे मनुष्यबळ हे तितकेच महत्वाचे आहे. तसेच त्यांचे प्रशिक्षण आणि माहिती तंत्रज्ञानाची जोड या बाबतही सखोल विचार करून याबाबतच्या शिफारशी या धोरणांत समाविष्य करण्यात आल्या आहेत.

मुख्यत्वे करून राष्ट्रीय सहकारी धोरण मसुद्यात खालील आठ मुद्द्यांवर आपले मत व शिफारसी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. सहकार चळवळ भक्कम करणे यासाठी प्रादेशिक असमतोल घालवणे, तसेच तरूण पिढीचा सहभाग वाढविणे आणि सहकार चळवळीचा आर्थिक पाया भक्कम करणे यांसाठी अनेकविध शिफारसी या मसुद्यात आहेत.

सहकारी संस्थांसाठी कायदेशीर चौकट व संरक्षण अधिक मजबूत करणे यासाठी नवे कायदे तसेच आजच्या कायद्यात सुधारणा करून केंद्र व राज्य सरकारे यांनी त्वरीत पावले उचलावीत. केंद्र सरकार, प्रत्येक राज्य सरकार व नियंत्रक यांनी सहकारासाठी पोषक वातावरण तयार करावे. असे करताना प्रत्येकाला समान संधी देण्यास प्राधान्य देण्यात यावे. त्यासाठी आवश्यक असल्यास कायद्यात दुरूस्त्या कराव्यात.

सहकारी संस्था सशक्त व समृध्द बनविण्यासाठी त्यांना आर्थिक मदत करून त्यांचा भांडवली पाया मजबूत करणे तसेच त्यांना माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी आर्थिक मदत, पायाभूत सोई सवलती व प्रशिक्षित मनुष्यबळ यासाठी प्रयत्न करणे.

ग्रामीण आणि शहरी क्षेत्रांमधील सहकारी संस्थांना अद्ययावत तंत्रज्ञान अंगीकारण्यासाठी संगणक, नेटवर्किंग आणि सॉफ्टवेअर खरेदीसाठी योग्य यंत्रणा व सल्ला देणे.

उत्तम संस्था संचालन (गुड गव्हर्ननन्स) –

यासाठी संचालक, सभासद व कर्मचारी यांना ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी व कार्यकौशल्य वाढविण्यासाठी मदत करणे, यासाठी सहकार विद्यापिठाची स्थापना व त्याचे व्यवस्थापन यांवर भर देण्यात यावा. या विद्यापिठाचे माध्यमांतून संपूर्ण देशात सहकाराबद्दलच्या प्रशिक्षणाचे नेटवर्क उभे केले जाईल.

शिक्षण व प्रशिक्षण ही निरंतर प्रक्रिया म्हणून प्रत्येक संस्थेने राबवावी. याचबरोबर शालेय शिक्षणांत सहकाराचे धडे अभ्यासक्रमांत समाविष्ट करण्यात यावेत. तसेच नक्त नफ्यातील एक टक्का भाग प्रशिक्षणासाठी वापरण्यात यावा.

सभासद संख्या वाढ व त्यांचा संस्थेतील सहभाग यांवरही जोर देणेत यावा. विशेषतः तरूण, महिला व आर्थिक दुर्बल घटकांचा तसेच विशेष क्षमता असलेल्या दिव्यांगांचा सहकारातील सहभाग वाढवून सहकाराचे माध्यमांतून त्यांचे सशक्तीकरण करावे. मसुद्यामध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, आज देशाची ६५ लोकसंख्या ३५ वर्षे वयोगटापेक्षा खालची आहे. यांतील ४० टक्के ही १३ ते ३५ वर्षे वयाची आहेत. इतकी तरूण शक्ती आपल्याकडे उपलब्ध असून या शक्तीला सहकारात ओढण्याची नितांत गरज असल्याचे समितीने आपल्या धोरणांत म्हटले आहे.

व्हायब्रंट इकोसिस्टीम तयार करणे–

इंटरनॅशनल को. ऑप युनियनने जगातील ३०० सहकारी संस्था निवडल्या आहेत. ज्या अत्यंत चांगल्या चालल्या आहेत. यामध्ये आपल्या देशांतील १६ संस्था आहेत. यांत चार सहकारी बँकां व एका पतसंस्थेचाही समावेश आहे. सहकारी संस्था चालवत असलेल्या व्यापारी आर्थिक संस्थांच्या माध्यमांतून उत्पादकता वाढविणे, स्पर्धात्मक युगात टिकण्यासाठी त्यांच्यात व्यावसायिकता आणणे. या सर्व संस्थांना अधिक सक्षम करून सहकारांत त्यांचा व्यापारी व आर्थिक सहभाग वाढविणे हे महत्वाचे आहे. त्यासाठी राज्य व केंद्र सरकारने आवश्यक पावले उचलावित, यासंदर्भातील यादीच केंद्रीय समितीने दिली आहे.

या धोरणांतून असा अर्थ निघतो की, राज्य सरकार

बरोबरच केंद्र सरकार ही सहकारी संस्थांचे पाठीशी समर्थपणे यापुढे उभे राहिल. या स्पर्धात्मक युगात सहकार क्षेत्र देखील माहिती तंत्रज्ञानाचा आपल्या व्यवहारांत व ग्राहक सेवा देण्यामध्ये उपयोग करून घेऊन ही चळवळ अधिक सशक्त बनवेल. सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी केंद्र सरकार या धोरणाव्दारे महत्वाचे बदल करू शकेल व त्याचे दूरगामी व सकारात्मक परिणाम पुढील काळात दिसतील.

पुढील दशक सहकाराचे असेल आणि त्यामध्ये महाराष्ट्राची भूमिका महत्वाची असेल. सहकार चळवळ रूजलेली व बळकट असलेली काही मोजकी राज्ये देशांत आहेत. त्यापैकी एक महाराष्ट्र आहे. महाराष्ट्रात आर्थिक क्षेत्रांबरोबरच विविध उद्योगधंदे व सेवा क्षेत्रांत सहकारी चळवळ सक्षम असून देशाच्या आर्थिक विकासात त्यांचे मोठे योगदान आहे.

थोडक्यात सहकारांतून समृध्दी हा संदेश घेऊन केंद्र सरकारने सहकार धोरण तयार करण्याचे माध्यमांतून सहकार चळवळीला नवसंजीवनी दिली आहे. सहकार ही एक जीवनशैली असून त्याचा अंगीकार करून ग्रामीण भागाचा विकास होऊ शकतो, हे या चळवळीने दाखवून दिले आहे. त्यांत विविध विकास सोसायट्या व छोट्या पतसंस्था या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेती व शेतीपूरक व्यवसाय यांना सुलभ पध्दतीने कर्जपुरवठा करून त्यांचे उत्पन्न वाढविण्याचे काम सहकाराचे माध्यमांतून आणि नाबार्ड, राज्य सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँकांच्या मदतीने या समितीच्या शिफारसींमुळे वेगाने सुरू होईल.

सर्वसामान्य, गरीब कर्जदारांची पत वाढवून त्याला सक्षम व समृध्द करण्याचे काम करणारी सहकारी चळवळ ही ज्यांचे हातात आहे, त्यांनी उत्तम संस्था संचालन करणे, ही चळवळीची गरज आहे. त्यांनी आपली संस्था योग्य रितीने, विश्वस्त वृत्तीने, प्रामाणिकपणे आणि पारदर्शी पध्दतीने चालवून कारभार केला तरच सहकाराची चांगली फळे चाखायला मिळतील.

नाहीतर सहकाराची जागा जर स्वाहाकाराने, स्वार्थाने आणि स्वहिताने घेतली तर या गोष्टी सहकार क्षेत्राची हानी करणा-या ठरतील, याची जाण सहकार संचालन करताना हजारो सभासदांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संचालक मंडळाने मनोमन ठेवली पाहिजे. म्हणूनच विना सहकार, नहीं उध्दार यांच बरोबर प्रथम विना संस्कार, नहीं सहकार हे तत्व अंगीकारल्यास सुसंस्कारित कार्यकर्ते सहकारी चळवळीत तयार होतील.

ग्रामीण भागातील प्राथमिक कृषी पतसंस्था ते मल्टीस्टेट शेडूल्ड बँका अशा सर्वच आर्थिक क्षेत्रांतील सहकारी संस्थांचे जाळे हे भारताला एक आदर्श आणि मजबूत अर्थव्यवस्था तयार करण्यास उपयोगी पडेल. यापुढे सहकाराला विशेषतः सहकारी बँकींग क्षेत्राला नवी दिशा देताना सहकारामध्ये तरूण पीढी कशी आकृष्ठ होईल आणि ती प्रशिक्षित व कार्यकौशल्ये असणारी कशी असेल, याचा विचार सहकाराची नवी दिशा देण्यात उपयोगी पडेल.

पतसंस्थांचे ठेवीदारांना विमा संरक्षण देणे, हे गरजेचे असून त्यावर ठोस व सर्वमान्य अशी योजना आजही तयार होत नाही, यासाठी केंद्रीय सहकार मंत्रालयाने पुढाकार घेऊन देशपातळीवर ठेव विमा योजना लवकरात लवकर लागू करणे, गरजेचे आहे. तसेच सहकार विद्यापिठाची स्थापना आणि सहकार मंत्रालयाची व विद्यापीठाची विभागीय कार्यालये असणे हेही तितकेच आवश्यक आहे.

थोडक्यात सहकार मंत्रालयाची स्थापना, राष्ट्रीय सहकार धोरणाचा मसुदा या दोन्ही गोष्टी सहकाराला नवी दिशा देणा-या ठरतील आणि यांमुळेच नजिकच्या भविष्यकाळात सहकारी संस्था या सहकाराच्या माध्यमांतून अधिक सशक्त व समृध्द बनतील, यांत शंका नाही.

**– अविनाश जोशी,**
निवृत्त रिझर्व्ह बँक अधिकारी,
सदस्य, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट

# रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला 'रिस्क मॅनेजमेंट' साठी प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला, युनायटेड किंगडमच्या सेंट्रल बँकिंगने प्रदान केलेला, 'रिस्क मॅनेजर ऑफ द इयर २०२४' हा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.

देशाच्या आर्थिक आणि बँकिंग स्थिरतेसाठी विविध आर्थिक जोखमींचे निरीक्षण आणि नियंत्रण हे आरबीआयच्या महत्त्वपूर्ण कार्यांपैकी एक आहे. बँकिंग आणि एकूणच आर्थिक क्षेत्रात सद्य कालावधीत जोखीम व्यवस्थापन (Risk Management) हा अत्यंत महत्त्वाचा आणि अत्यंत गुंतागुंतीचा विषय बनला आहे.

जोखीम व्यवस्थापनासाठी आंतरराष्ट्रीय मानके आहेत. ही मानके विविध जोखमींचे कार्यक्षम मूल्यांकन, व्यवस्थापन आणि जोखीम कमी करण्यासाठी नियम, मार्गदर्शक तत्त्वे आणि कार्यप्रणाली आखण्यास मदत करतात. बँकिंग आणि आर्थिक क्षेत्रासाठी बेसल समितीद्वारे विशिष्ट मानके विकसित केली आहेत. ती क्रेडिट, मार्केट आणि ऑपरेशनल जोखीम यावर लक्ष केंद्रित करणारी आहेत. याशिवाय अन्य आंतरराष्ट्रीय जोखीम मानके आहेत जसे की ISO 31000:2018 आणि COSO Interprise Risk Management Framework. ही दोन मानके जरी बँकिंग क्षेत्रासाठी नसली तरी त्यातील काही भाग बँकिंगसाठी उपयोगी पडणारे आहेत. मात्र ती विशेषतः बँकांच्या आयटी पायाभूत सुविधांसाठी उपयुक्त आहेत. याशिवाय रिझर्व्ह बँकेने जोखीम व्यवस्थापनासाठी काही भारतीय मानके विकसित केली आहेत. मुख्यत्वे कृषी अर्थव्यवस्था असल्याने, भारतीय अर्थव्यवस्थेवर हवामान बदल आणि पावसाचा परिणाम मोठया प्रमाणावर होतो. म्हणून आरबीआयने अलीकडेच हवामान बदल जोखीम व्यवस्थापन मॉड्यूल विकसित केले आहे. सर्व बँकांना हवामान बदलाच्या जोखमीच्या मूल्यांकनासाठी समिती स्थापन करण्यास सांगितले आहे. जोखीम व्यवस्थापनासाठी सध्या प्रत्येक बँकांत समित्या आणि कार्यप्रणाली आहेतच.

चलन, चलनवाढ, महागाई, पैशांचा पुरवठा, देशाची आर्थिक स्थिरता, बँकिंग क्षेत्राची स्थिरता, जीडीपी वाढ आणि अशा अनेक जोखमींचे व्यवस्थापन आरबीआय करते.

जोखीम व्यवस्थापन कार्यप्रणाली तयार करण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आरबीआयचा जोखीम देखरेख विभाग सतत कार्यरत असतो. गेल्या काही वर्षांत आरबीआयने तीन मुख्य क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे. विद्यमान जोखीम नियंत्रणे मजबूत करणे, जोखमींच्या विस्तृत श्रेणी जाणून घेऊन त्यासाठी नवीन कार्यप्रणाली विकसित करणे आणि संपूर्ण संस्थेमध्ये मजबूत जोखीम संस्कृतीचा प्रचार करणे.

याचा एकूण परिणाम असा झाला की आरबीआयने आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत असे प्रगत श्रेणीचे जोखीम व्यवस्थापन साध्य केले आहे. यामुळे भारतीय अर्थव्यवस्था आणि बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय स्थिरता प्राप्त झाली आहे.

याचाच परिणाम म्हणजे आरबीआयला 'रिस्क मॅनेजर ऑफ द इयर २०२४' हा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला. प्रत्येक भारतीयाला याचा अभिमान वाटला पाहिजे आणि त्याहीपेक्षा आपण जे बँकिंग क्षेत्रात आहोत त्यांना जरा जास्तच!

**लेखन – प्रमोद कुलकर्णी, पुणे.** (बँकिंग अभ्यासक)



Scanned with OKEN Scanner

# पौराणिक वारसा लाभलेलं गाव - वाई

माझे वाई हे सातारा जिल्ह्यातलं एक टूमदार गाव. तशी त्याची ओळख ही दक्षिण काशी म्हणून फार वर्षांपासून आहे. आमच्या गावचा ढोल्या गणपती, मोजता न येण्याइतकी मंदिरे, जुन्या काळातले वाडे, संथ वाहणारी कृष्णा नदी, त्यावरचे प्रशस्त घाट, तीनशे वर्षांपासून होणारा कृष्णाबाईचा महोत्सव आणि अर्थातच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली अशी ही आमची विराट नगरी! आलिकडे तर शूटिंगचे गाव म्हणून सुद्धा प्रसिद्ध!

एक तीर्थक्षेत्र म्हणून असेल किंवा पेशवे यांचे सरदार श्रीमंत रास्ते यांनी जुन्या पुण्याची संस्कृती जपणारी म्हणून वसवलेली एक छोटी प्रतिकृती असेल, वाई ह्या गावाने आपल्या सर्व परंपरा सतत जपल्या. त्यामुळे सर्व सण वार अगदी आम्ही मनापासून मानले आणि उपभोगले. सर्व ऋतूमध्ये गावाच्या वेगवेगळ्या पण खूप आठवणी साठवल्या.

आषाढातला पाऊस, त्यावेळी सह्याद्रीतल्या दऱ्या खोऱ्यांना जोरदार आंघोळ घालायचा आणि मग पांचगणी, महाबळेश्वर, पांडवगड, मांढरदेवी, कमळगड, सोनजाई आणि असे अनेक डोंगर त्यांच्या अंगावरचे पाणी धरणात आणि नदीत सोडायचे. नदीची पातळी वाढायची आणि मग आम्हाला पोहायला जोश यायचा. नदीकाठच्या मंदिरावर चढून त्या वेगाने वाहणाऱ्या पाण्यात उडी मारताना आणि मग पुढच्या घाटावर पाण्याचा प्रचंड वेग काटून, पाण्यात असणाऱ्या खोल भोवऱ्यांशी सामना करत काठाला लागताना जग जिंकल्याचा आनंद चेहऱ्यावर असायचा. काठावरचे पूर पाहायला आलेले तर आमच्याकडे धाडसी मुले म्हणून पाहायचे. आणि मग श्रावण यायचा.

**श्रावण मानसी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे, क्षणात पडते सरसर शिरवे, क्षणात फिरूनी ऊन पडे,** ही बालकवीचे कवितेतले शब्द आम्ही सर्व वाईकर अक्षरशः जगलो. आषाढीत पावसामुळे डोंगर, शेते हिरवीगार झालेली असायची. शेतांमध्ये पेरण्या चालू असायच्या. सभोवतालचे डोंगर आमच्या वाईला जणू हिरवा शालू नेसवायचे. पांचगणीच्या घाटमाथ्यावरून कृष्णा नदीत प्रतिबिंबित झालेले इंद्रधनुष्य सप्तरंगी अनुभव द्यायचे. संध्याकाळी आकाशात बगळ्यांची माळ दिसायची. नदीचा पूर ओसरला असला तरी आकाशाचे निळे आणि काठावरच्या कंजाळाच्या आणि इतर झाडांचे हिरवे प्रतिबिंब दाखवत नदी दुथडी भरून वाहत असायची.

या पार्श्वभूमीवर आमचा विटी दांडू चा खेळ घाटावरच्या पटांगणा वर सुरु व्हायचा. आमच्यातले काही जण विटी करण्यात तरबेज होते. सरसर कडुलिंबाच्या झाडावर चढून एखादी छोटी फादी काटून त्यापासून कुऱ्हाडीने मस्त विटी दांडू बनवायचे. दोन संघ, ते टीम वर्क, तो एकमेकांना सूचना देताना, कौतुक करताना, चिडवतानाचा गलका आजून ही कानात दुमदुमतो. परत सगळे कसे एक बटण दाबून झटक्यात त्यादिवसात जावे असे वाटते. पावसाची रिमझिम चालू असताना खेळलेला भोवरा आणि त्या ओल्या रस्त्यावर खडुने मारलेले त्याचे रिंगणाची रेघ अजूनही मनात तशीच आहे.

श्रावण हा सुट्ट्याचा महिना. नागपंचमीला सकाळी काहीं लोक टोपलीत नाग घेऊन नागोबा पुजायचा आहे का नागोबा असे ओरडत जायचे. आम्ही त्यांचा मागे धावायचो कारण नाग दर्शनाची उत्कंठा काही और असायची. काही गृहिणी त्यांना थांबवायच्या आणि पुजायच्या. टोपीतून फुस फुस करत नाग बाहेर आला, की मात्र भंबेरी उडायची. मुख्य चौकात धर्मापुरीच्या घाटावर नागाचे मंदिर आहे. त्याला सगळा गाव यायचा साहजिकच तिथे मोठी जत्रा भरायची. बाबा मला २-३ रुपये खर्चाला द्यायचे. केवढे वाटायचे ते! २५ पैशाला टिक टिक, १० पैशाला पिपाणी,

पाणी घातलेला फुगा व त्याला रबरचा दोरा, लाल पिवळ्या निळ्या पट्ट्याचा रबरी चेंडू आणि साखर लावलेल्या लिम्लेट च्या छोट्या आणि अगदी उच्च म्हणजे पोपिन्स वेगवेगळ्या रंगातल्या त्या गोळ्या. हे सर्व खरेदी करताना आनंद गगनात मावत नसे आणि हे सर्व करूनही पैसे उरायचे.

कृष्णाष्टमीला मुख्य चौकातली दही हंडी बघायला खूप मजा यायची. दिवसभर शेतात काम केलेल्या शेतकऱ्याची तरुण मुले सरासरा मानवी मनोरे करत हंडी फोडायचे. ते सर्व माझे हिरो असायचे. नारळी पूर्णिमेचा नारळी भात, नागपंचमीचे दिंड, १५ ऑगस्ट ला रस्त्याच्या बाजूला तात्पुरत्या उभ्या केलेल्या तंबूत तयार केलेली जिलबी, कृष्णाष्टमीचा काला ह्या सर्वांच्या चवी अजूनही जिभेवर रेंगाळत आहेत. हे बहुतेक सर्व पदार्थ लोकांच्या घरीच होत असत. बाहेर जाऊन हे विकत घेण्यासाठी दुकानें किंवा हॉटेल्स नव्हती. आमच्या आई वडिलांनी हे सर्व आमच्यासाठी मनापासून केले. नंतर मग गणपतीच्या दिवसात दररोज पहाटे पाच वाजता कुणाकडे जाऊन त्यांच्या घरातल्या गणपती समोर एकवीस वेळा सामूहिक अथर्वशीर्ष म्हणताना एक पवित्र अनुभव येत असे.

दसरा दिवाळी करत मग फेब्रुवारीपासून घाटावर कृष्णाबाईचा महोत्सव सुरु होत असे. त्याचा मांडव हा अगदी पारंपरिक म्हणजे मांडववाले घालतात तसा अजिबात नाही. आज कुणाला मुहूर्त मेढ म्हणजे नक्की काय असे विचारले तर कदाचित सांगता येणार नाही. पण आम्ही त्यासाठी लहानपणी पाहरी घेऊन खड्डे खणले आणि त्या वजनदार मेढी कृष्णाबाईच्या मांडवात उभ्या केल्या. मिरवणुकीत ढोल आणि झांजा वाजवल्या गुलालामध्ये न्हावून घेतले. छबीन्याच्या पूर्ण रात्री धनगरी ढोलावर ताल धरताना चा अनुभव हा शब्दात मांडणे अशक्य! कृष्णाबाईच्या महाप्रसाद म्हणजे गावजेवण. त्या आमटी भाताची चव ही फक्त त्या घाटावरच.. ती स्वर्गीय चव कुठून येते हे ते त्या कृष्णामातेलाचं ठाऊक. कित्येक पिढ्या आल्या आणि गेल्या. आम्ही ही त्या आमटी करण्यास हातभार लावला पण तशी आमटी कधी घरी होऊच शकत नाही. रात्रभर लाकडाच्या विस्तवावर भल्या मोठ्या भांड्यामध्ये आमटी, भात, वांग्याची भांजी करताना कृष्णामाईची सेवा केल्याचे अद्वितीय आणि आधात्मिक समाधान मिळते

बाकी मग दशहार, चैत्रातली आंबे डाळ आणि पन्हं, भाद्रपदात गौरीची आणि संक्रातीतील हळदीकुंकू, मंगळगौरीची आणि हरितालिकेची जागरणे, नवरात्रीतील भोंडले आणि गरबे, वट पौर्णिमेला बहुतेक सर्व घरातील घाटांवरील वडाला पूजणाऱ्या बायका आणि अशा अनेक सणांनी वाईला समृद्ध आणि पारंपरिक बनवले आहे.

वाईमध्ये कुठल्याही दिशेने प्रवेश केला तरी दोन्ही बाजूला हिरवीगार शेते ही दिसणारच. ज्वारी, बाजरी, तांदूळ, हळद, ऊस, निरनिराळ्या भाज्या आणि आजकाल स्ट्राबेरी सुद्धा ह्या काळ्या मातीत खुलून दिसते. पूर्वेकडे बघणारी सूर्यफुले, पिवळ्या किंवा केशरी रंगाची झेंडूची फुले, रस्त्याच्या दोन्ही बाजूने असणाऱ्या उंच झाडानी एकमेकांमध्ये एकरूप होऊन केलेले नैसर्गिक बोगदे, त्यांच्या जमिनीला भिडलेल्या पारंब्या, उन्हाळ्यात वेगवेगळ्या लाल केशरी रंगाच्या छटांनी फुललेले गुलमोहोर ह्यांनी वाईच्या सौन्दर्यात अवर्णीय अशी भर टाकली आहे. नाना फडणवीसांचा वाडा, रास्ते यांची मोतीबाग, अफजल खानाची भिंत, वामन पंडितांची समाधी वाईच्या इतिहासाची साक्ष देतात. भद्रेश्वर, वाकेश्वर, पंचायतन, काशी विश्वेश्वर आणि अशी अनेक मंदिरे अप्रतिम वस्तू स्थापत्याचा अविष्कार दाखवत आजही दिमाखात उभी आहेत.

अनेक वर्षात वाई खूप बदलली. बदल ही एकच गोष्ट स्थिर असते. पण बदल हा काही चांगल्या आणि काही न रुचणाऱ्या गोष्टी घेऊन येतो. वाई ही याला अपवाद नाही. जुने वाडे पाडून अपार्टमेंट झाले पण पार्किंगची योग्य व्यवस्था न करता, आमचा लाडका ढोल्या गणपती पूर्णपणे व्यावसायिक झाला. वाहनाची संख्या जास्त आणि अरुंद रस्ते ह्यामुळे ट्रॅफिकची बोंबाबोंब सुरु झाली. संथ वाहणारी

कृष्णाबाई आता कधी वाहते की नाही हेच कळत नाही. तिला शेवाळे आणि अनेक नको त्या गोष्टींनी दूषित केले आहे. वाई हे पर्यटन स्थळ झाल्याने घाट अस्वच्छ झाले (काही सेवाभावी समूह दर रविवारी घाट स्वच्छ करतात पण लोक काही घाण करायचे कमी होत नाहीत) पार्किंग कडे अजिबात लक्ष नाही, सुरूरवरून वाईत येताना पूर्वी फक्त शेते दिसायची आता त्या शेतामध्ये बांधकामे दिसतात, दुतर्फा अनेक हॉटेल्स झाली आहेत (हो आणि ते सगळेच चुलीवरचे आणि गावरान जेवण देतात).

बदल हा आधुनिक असतो त्यामध्ये अर्थकारण ही असते, नवीन पिढीला शहरांत असलेल्या सुविधा मिळाल्या नाहीत की, त्यांचा त्या गावातला इंटरेस्ट संपतो. त्यामुळे बदल हा हवाच. पण आपल्या परंपरा जपून आणि बदल चांगल्या प्रकारे घडवून त्यासाठी समाजाची आणि राजकीय चांगली इच्छा शक्ती लागते. व. पु. काळेंनी म्हटले आहे, स्वतःची मते किती ही निर्भीड असली तरी शेवटी तार्तम्याचा प्रश्न येतोच त्यामुळे मी यावर अधिक लिहिणे उचित समजत नाही.

मी मात्र अजूनही ती जुनी वाई शोधण्याचा प्रयत्न नेहमी करतो. काही गोष्टी मात्र अजूनही अबाधित आहेत पण जुन्या आणि नव्या वाईत एक दुवा असेल तर तो लहानपणीचे मित्र. त्यांच्या विना मी वाई बघू शकत नाही. त्यांचे बोलण्यात वागण्यात आणि प्रेमात काही फरक नाही. ते वाढतच चालले आहे. त्यांच्याबरोबर काही क्षण घालवणे म्हणजे परत लहान होणे. एकमेकांची सुख–दुःखे समजून घेताना मिळणारं मानसिक समाधान हे मैत्री एका वेगळ्या उंचीला नेते. त्यांची मुले हक्काने आम्हाला काका म्हणतात तेव्हा हे नातेसबंध घट्ट आहेत, ह्याची जाणीव होते आणि ती भावनाच खूप प्रेमळ असते. अशी ही आमची वाई.

माझे वडील नोकरीच्या निमित्ताने साठ वर्षांपूर्वी इथे आले आणि शेवटचा श्वास इथेच घेऊन स्वर्गवासी झाले. त्यांनी अनेक मित्र आणि सबंध जोडले आणि मला वाडा संस्कृतीचे संस्कार देऊन एक घर ही बांधले. वाई हेच आपले शेवटचे स्थानक हा संदेश ही दिला. बाबांनी मला खूप प्रेम तर दिलेच, पण त्यांनी मला वाईकर होण्याची जी एक संधी दिली त्यासाठी मी त्यांचा सदैव ऋणीच राहीन.

– लेखक– **ऋविज कुलकर्णी (व्हॉटस् अॅपवरून साभार)**

**टॅक्स गुरू -**

- एखाद्याचं उत्पन्न ३ ते ७ लाखांपर्यंत असेल तर ५%
- ७ ते १० लाख असेल तर १०%,
- १० ते १२ लाख असेल तर १५%
- १२ ते १५ लाख असेल तर २०%
- १५ लाखाहून अधिक असेल तर ३%
- यातून पैसे उरल्यावर गाडी घेताना ३०%
- गाडी चालवताना कमीत कमी २००० रुपयांचा टोल
- रोजच्या सामान खरेदीत ५–१५ % जीएसटी
- इलेक्ट्रिसिटी बिल वर १८ % कर
- मोबाईल रिचार्जवर १८ % कर
- धान्यावर ५ % कर
- पेट्रोल आणि डिझेलवर २०% च्या आसपास टॅक्स
- कुठल्याही इलेक्ट्रिक वस्तूवर १८–२८ % टॅक्स
- हॉस्पिटलमध्ये गेल्यावर ५ %
- औषध गोळ्यांवर १२ % कर
- हेल्थ इन्शुरन्स, पॉलिसीवर १८ %

**या सगळ्यातून पैसे वाचले आणि तुम्ही ते**

- म्युच्युअल फंडमध्ये गुंतवले तर STCG २०%
- दिर्घकाळ ठेवले तर LTCG १२.५ %

**ज्या पैशांवर तुम्ही ऑलरेडी टॅक्स दिलाय त्याच पैशातून**

- तुम्ही शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवले तर तिथेही STCG २० %
- लाँग टर्म ठेऊन मग शेअर्स विकले तर १२.५ % टॅक्स
- सेक्युरिटी ट्रान्झॅक्शन टॅक्स ०.०६२५ %
- शेअर्स घेतल्यावर आलेल्या डिव्हीडंडवर १० %
- तुम्ही घर घेता तेव्हा १ ते ५ % टॅक्स, स्टॅम्प ड्युटी
- त्यानंतर १० रुपये स्क्वेअर फुट प्रमाणे प्रॉपर्टी टॅक्स
- त्यानंतर घर विकताना त्यावर परत १२.५ टक्के टॅक्स



Scanned with OKEN Scanner

# बँक राष्ट्रीयकरण- एक पुनरावलोकन

दिनांक १९ जुलै २०२४ रोजी बँक राष्ट्रीयकरणास ५५ वर्षे पूर्ण झाली. १९४७ च्या स्वातंत्र्यानंतर बँकिंग क्षेत्रातील फार मोठा निर्णय इंदिरा गांधी सरकारने घेतला आणि तो म्हणजे दि. १९ जुलै १९६९ रोजी देशातील प्रमुख १४ खाजगी क्षेत्रातील बँकांचे राष्ट्रीयीकरण म्हणजे सरकारीकरण केले. इंदिरा गांधी सरकारचे असे ठाम मत झाले होते की, बँका या ठराविक श्रीमंतांचे आर्थिक हित पाहत आहेत. खेड्यापाड्यातील गरीब व छोट्या शेतकऱ्यांपर्यंत बँकिंग सेवा पोहोचतच नाहीत. त्याचे लाभापासून तो वर्ग सतत वंचित राहत आहे. खाजगी बँका खेडेगावात जात नाहीत. त्यामुळे गरीब व छोटे शेतकरी सावकारी पाशात अडकत आहेत. मूठभर श्रीमंत लोक बँकिंग क्षेत्राचे मालक आणि उपभोक्ते झाले आहेत. गरीब अधिकच गरीब होतो आहे. गरिबी हटाव हा प्रमुख कार्यक्रम घेऊन इंदिरा सरकारने बँकांचे राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घेतला. प्रथम १९ जुलै १९६९ रोजी प्रमुख १४ खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले गेले आणि त्या धर्तीवर १५ एप्रिल १९८० रोजी आणखी सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण केले गेले.

१९ जुलै १९६९ व त्यानंतर एप्रिल १९८० या दोन्ही वेळच्या राष्ट्रीयकरणामुळे बँकिंगचे बदलते स्वरूप, त्यांचे बरे वाईट परिणाम, त्यांचा हेतू खरोखर साध्य झाला का, आणि या पार्श्वभूमीवर आजपर्यंत हे बदल का टिकू शकले नाहीत, याचा विचार आता करण्याची आवश्यकता आहे. खरंच राष्ट्रीयकरण यशस्वी झाले असे मानले तर आज आपण काहीशी विपरीत परिस्थिती बँकिंग क्षेत्रात अनुभवतो आहोत.

खाजगी मालकीच्या बँकांचे सरकारीकरण म्हणजे राष्ट्रीयकरण झाले. परंतु पुढे १९९१ साली पुन्हा खाऊजा धोरण म्हणजेच खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या धोरणाची अंमलबजावणी करत असताना नरसिंहराव सरकारने पुन्हा खाजगीकरणाला महत्व दिले. आता पुन्हा भारतीय रिझर्व बँकेने भांडवली पाया मोठा असलेल्या आणि प्रगत माहिती तंत्रज्ञानावर आधारित काम करणाऱ्या खाजगी बँकांना लायसन्स दिली आहेत. या बँका टेक्नॉलॉजीचा वापर करून ग्राहकांना विशेषतः तरुण ग्राहकांना आकर्षित करत आहेत. म्हणजेच हे सर्व घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याचा प्रकार आहे. आपण पैशाचे विकेंद्रीकरण करण्यासाठी उद्योगपतींच्या हातून बँकिंग व्यवस्था काढून घेऊन सामान्य गरीब शेतकरी, कष्टकरी यांचे फायद्यासाठी राष्ट्रीय करणाचे पाऊल उचलले. मात्र आज पुन्हा मोठे उद्योगपतीच खाजगी बँका काढत आहेत.

बँक राष्ट्रीयकरणाची प्रमुख उद्दिष्टे जर आपण पाहिली तर सामाजिक कल्याण, गरीब, गरजू शेतकरी, कष्टकरी यांना पत मिळवून देणे. मोठमोठ्या उद्योगपतींच्या हाती एकवटलेले आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करणे, बँकिंग सेवा तळागाळातील गरिबांपर्यंत पोहोचविणे, यासाठी बँकिंग शाखांचे जाळे खेडेगावापर्यंत नेणे. यांतून सामाजिक असमतोल कमी करणे, शेती, लघुउद्योग यासारख्या अग्रक्रम क्षेत्रातील उद्योगांना अर्थ पुरवठा जलद गतीने करणे. सामान्य लोकांना बचतीची सवय लावणे, गरीब कुटुंबे, शेतकरी, कष्टकरी समाजाची सावकारी पाशातून मुक्तता करणे. सरकारी नियंत्रणे, लायसन्स राज वगैरे कमी करून उपेक्षित समाजातील लोकांना पत उपलब्ध करून देणे, हेच उद्दिष्ट राष्ट्रीयकरण करण्यामागे होते.

मात्र आता हे धोरण राबवत असताना सरकारी बँकात ग्राहक सेवेचा दर्जा घसरू लागला. नोकरशाहीची अरेरावी, राजकीय हस्तक्षेप, व्यावसायिकतेचा अभाव या गोष्टी बँकिंगमध्ये प्रकर्षाने जाणवू लागल्या आहेत. बँकांची नफाक्षमता कमी होऊन अनुत्पादक कर्जात वाढ दिसून येत आहे. तोटे असूनही काही प्रमाणात वर दिलेली उद्दिष्टे



Scanned with OKEN Scanner

पूर्ण झाली आहेत. शाखा विस्तार खेडेगावापर्यंत झाला. अग्रक्रम क्षेत्रास पतपुरवठा उपलब्ध झाला, हे मान्य करावे लागेल. खरं तर

बँक राष्ट्रीयकरणास इंदिरा गांधी याच कारणीभूत आहेत. त्यांचे सहकारी मात्र सर्व त्यांच्याशी सहमत होतेच असे नाही. त्यांचे मंत्रिमंडळातील अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी काही मुद्द्यावर फेरविचाराची कल्पनाही मांडली. १९ जुलै १९६९ रोजी मात्र इंदिरा सरकारने वटहूकूम काढून हा निर्णय अंमलात आणला. त्यात दोन मतभेदाचे मुद्दे होते. एक म्हणजे खाजगी करण करून बँका सरकारने ताब्यात /विकत घ्याव्यात, हे काहींना मान्य नव्हते आणि संसदेस असा अधिकार आहे काय याविषयी सुद्धा दुमत होते. त्याचबरोबर खाजगी बँकांचे मालक सरकार देत असलेल्या नुकसान भरपाईस राजी नव्हते. त्यामुळेच हा वटवुकम सर्वोच्च न्यायालयात चॅलेंज केला गेला.

त्यातील तरतुदी घटनाबाह्य आहेत, म्हणून रद्द करण्याची मागणी केली गेली .परंतु दोन्ही बाजू ऐकून त्यावर सर्वोच्च न्यायालयाने बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याच्या संसदेचा हक्क मान्य केला. परंतु त्यातील नुकसान भरपाईच्या काही अटी घटनाबाह्य ठरवल्या. यामुळेच केंद्र सरकारने १४ फेब्रुवारी १९७० रोजी बँक राष्ट्रीय करण्याबाबत दुसरा वटहुकूम काढला. आणि तो पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच १९ जुलै १९६९ पासून लागू असल्याचे जाहीर केले. यासंदर्भात न्यायालयाने कायद्यात योग्य ते बदल केले आणि रूपांतर नंतर कायद्यात झाले. अशा तऱ्हेने अखेर हा कायदा पुढे अंमलात आला आणि याच धर्तीवर पुढे १५ एप्रिल १९८० रोजी आणखी सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले.

आज पुन्हा बँकांची संख्या एकत्रिकरणाने किंवा विलीनीकरणाच्या माध्यमातून कमी करणे, त्यांना खाजगी नव्या बँकांशी स्पर्धा करून, राष्ट्रीयकृत बँकानी बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तत्पर व विनम्र ग्राहक सेवा यांचा अंगीकार करणे,आवश्यक झाले असून तशी सुधारणा त्यांचे कार्यपद्धतीत हळू हळू दिसू लागली आहे.

मार्च २०२३ च्या आकडेवारीनुसार सर्व राष्ट्रीयकृत बँका नफ्यांमध्ये आल्या आहेत. थकीत कर्जांचे प्रमाणही कमी झाले आहे. मार्च २३ अखेर ग्रॉस एनपीए ३.९% असून नेट एनपीए केवळ एक टक्का आहे. कर्ज वसुलीचे प्रमाण चांगले झाल्यानेच हे शक्य झाले आहे, असे आकडेवारी दिसून येते. राष्ट्रीयकरण झालेल्या बँकांची संख्या आज १२ वर आली आहे. त्यांचे कार्य तत्परतेत खाजगी बँकांचे स्पर्धेमुळे सुधारणा झाली आहे, यात शंका नाही. परंतु हेही सत्य आहे की, घड्याळाचे काटे पुन्हा उलटे फिरू लागले आहेत. खाजगीकरणाचे महत्त्व त्यामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

रिझर्व बँकेने खाजगी क्षेत्रात एचडीएफसी, आयसीआयसीआय, कोटक महिंद्रा, येस यांसारख्या बँकांना त्याचबरोबर स्मॉल फायनान्स पेमेंट बँकांना नवे तंत्रज्ञान आणि भक्कम भांडवली पाया देऊन स्पर्धेत उतरवले आहे. या सर्व बँका पुन्हा मोठमोठ्या उद्योग समूहांनी सुरू केलेल्या बँका आहेत. थोडक्यात राष्ट्रीयकरण ऐवजी पुन्हा खाजगीकरणाच्या दिशेने बँकिंगचा प्रवास सुरू झाला आहे.

सप्टेंबर २०२० मधील बँकिंग रेगुलेशन क्टमध्ये झालेल्या सुधारणांमुळे रिझर्व बँकेस खूपच अधिकार मिळाले आहेत. टेक्नॉलॉजी, संगणकीकरण यांमुळे सायबर सिक्युरिटीचे धोके वाढले आहेत. कॅशलेस, डिजिटल बँकिंग, आभाशी चलनाचा वाढता वापर, सीबीडीसी नावाने रिझर्व बँकेचे मान्यता प्राप्त चलनातून आता व्यवहार वाढत आहेत. जोखीम व्यवस्थापन यास अधिकाधिक महत्त्व रिझर्व बँक देत आहे. खरे तर आजचा ग्राहक आणि विलफूल डिफॉल्टर ही मोठी रिस्क बनली आहे. त्यामुळे तळागाळातील सर्वसामान्य गरीब लोकांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी निर्माण केलेले राष्ट्रीयकरण धोरण खरंच आजही आवश्यक आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. परंतु यापुढे नव्या सुधारणा या निश्चितच नव्या बँकिंगचे रूपाने तरुण पिढी आणि सामान्य गरीब लोकसुद्धा

स्वीकारून भारताचे आर्थिक प्रगतीस हातभार लावतील, यात शंका नाही. बँक राष्ट्रीयकरणाचे पुनरावलोकन करताना एवढेच म्हणावेसे वाटते की, त्या काळात असलेल्या सामाजिक परिस्थितीमध्ये, त्यावेळच्या सरकारला हा निर्णय काळाची गरज म्हणून आवश्यक वाटला ही असेल आणि त्याचे फायदे निश्चितच मिळाले असतील. परंतु आज बँकिंग व्यवसाय, व्यवस्थाच बदलली आहे.

नवीन सामाजिक गरजा, उद्योगधंद्याची वाढ, आयटी क्षेत्रातील क्रांती याचा विचार करता, आज झालेले बदल हे स्वीकारणे अपरिहार्य आहेत. बदलते बँकिंग याची काळजी घेत आहे. मोबाईल बँकिंग, कॅशलेस, फेसलेस बँकिंग, डिजिटल, इंटरनेट बँकिंग ही आजच्या काळाची गरज आहे. विशेषतः तरुण पिढीची ती गरज आहे. या पार्श्वभूमीवर आज जरी भारतीय रिझर्व बँकेचे नियंत्रण, सुपरव्हिजन, रेग्युलेशन हे जरी कडक वाटत असले, तरी सशक्त आणि सुदृढ बँकिंग व्यवस्था ठेवण्यासाठी ते आवश्यक आहे.

आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि उत्तम व्यवस्थापन (एफएसडब्ल्यूएम) असलेल्या बँकांना लावलेले निकष हे बँकांच्या हिताचे आहेत. सर्व विवेकपूर्ण निकषांचे (प्रुडेंशिअल नॉर्मसचे) पालन करणे, बँकांना हितकारकच आहे. विशेषतः सहकारी बँकांना कडक नियंत्रणाचा आज त्रास वाटत असला, तरी यातून उत्तम, सदृढ बँका निश्चितच टिकून राहतील. एकूणच भारताची बँकिंग व्यवस्था ही आज जगात नावाजली जाते. यातूनच देशाची आर्थिक प्रगती होऊन देश एक भक्कम अर्थव्यवस्था असलेला प्रगत देश म्हणून जगात नावारूपाला येईल, यात शंका नाही.

– **अविनाश जोशी, वाई** निवृत्त रिझर्व बँक अधिकारी, व्यवस्थापन मंडळ सदस्य.

आपल्या बँकेतील आयटी अधिकारी सुजय तांबे यांचे बंधू **संदेश सुभाष तांबे** यांची पुणे जिल्हा परिषदेत सहा. अभियंता म्हणून निवड झाली. त्यांचेही हार्दिक अभिनंदन.

# हार्दिक अभिनंदन

आपल्या बँकेचे **मा. संचालक मंडळ** यांच्या संकल्पनेतून प्रदिर्घ काळात सेवक म्हणून कार्यरत असलेले व नोकरी करीत पदवी परिक्षा तसेच बँकेने घेतलेली लेखी परिक्षा व मुलाखतीव्दारे लेखनिक म्हणून नव्याने नियुक्त झालेले

**१) श्री. निखिल दत्तात्रय साळवेकर– प्रधान कार्यालय**
**२) श्री. राजेंद्र हरिभाऊ जायगुडे– प्रधान कार्यालय**
**३) श्री. अक्षय पोपट आवळे– शिरवळ शाखा**
**४) श्री.शशिकांत लक्ष्मण साबळे–सातारा शहर शाखा**
**५) श्री. सागर विश्वनाथ शिंदे– वाई शाखा**
**६) श्री. विशाल विजय शिंदे– फलटण शाखा**
**७) श्री. सागर अनिल अवधूत – पुणे विभाग**
**८) श्री. विरेंद्र गोविंद शिंदे – पुणे विभाग**
**९) श्री. किरण प्रकाश सावंत – पुणे विभाग**
**१०) श्री. अक्षय सुनील राजपुरे – पुणे विभाग**

या कर्मचा–यांचे **बँकेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.**

हार्दिक अभिनंदन



आपल्या बँकेतील कर्मचाऱ्यांचे गुणवंत मुलां–मुलींनी १० वी व १२ वी च्या बोर्ड परिक्षेत उत्तुंग यश मिळवले.

**१) कु. मृणाली राजेंद्र कांबळे – १२ वी**
**२) चि. वेदांत संजय जाधव – १२ वी**
**३) चि. पौरस संतोष बागुल – १० वी**
**४) चि. ईशान प्रसाद कुलकर्णी – १० वी**
**५) चि. सिध्दार्थ संतोष क्षीरसागर – १० वी**
**६) चि. अथर्व गणेश यादव – १० वी**
**७) चि. आयुष राजेंद्र कांबळे – १० वी**

या सर्वांचे व सर्व कर्मचाऱ्यांच्या गुणवंत मुलां–मुलींचे **बँकेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.**

## आपल्या बँकेचे व्याजदर खालीलप्रमाणे (दि. ३० मार्च २०२३ पासून लागू)

| ठेवीचे व्याजदर | | | ठेवीचे व्याजदर | | |
|---|---|---|---|---|---|
| | सर्वसाधारण | ज्येष्ठ नागरीक | | सर्वसाधारण | ज्येष्ठ नागरीक |
| सेव्हींग्ज व्याजदर | २.५०% | २.५०% | १ वर्ष ते २ वर्षांपर्यंत | ६.८०% | ७.३०% |
| १५ ते ४५ दिवस | ३.००% | ३.५०% | २ वर्ष ते ३ वर्षांपर्यंत | ७.००% | ७.५०% |
| ४६ ते १७९ दिवस | ४.५०% | ५.००% | ३ वर्ष ते ५ वर्षांपर्यंत | ६.५०% | ७.००% |
| १८० ते २१० दिवस | ५.२५% | ५.७५% | ५ वर्ष ते १० वर्षांपर्यंत | ६.५०% | ७.००% |
| २११ ते ३६४ दिवस | ५.७५% | ६.२५% | ● रिकरिंग ठेवीवर वरील मुदत व दरानुसार व्याज मिळेल. | | |

## सोनेतारण कर्ज

कर्ज मर्यादा प्रति तोळा (10 ग्रॅम ला)
रु. 47,000/-

**9.25% व्याजदर**

## वाहन कर्ज

कार लोन मुदत 7 वर्ष
दुचाकी लोन मुदत 3/5 वर्ष

**9.50% व्याजदर**

## घर बांधणी कर्ज

**मर्यादा रु. 25 लाख**

घर तुमच्या स्वप्नातलं...
बँके संगे साकारेल सत्यातलं...

**10 % व्याजदर**

## कॅश क्रेडीट

व्यापारी उद्योजकांसाठी

**13 % व्याजदर**

## व्यावसायिक वाहन कर्ज

मुदत 5 वर्ष

**11.50 % व्याजदर**

## टर्म लोन

मुदत 5/7 वर्ष

**13 % व्याजदर**

### आपले नम्र : संचालक मंडळ

श्री. अनिल देव - अध्यक्ष
डॉ. श्री. शेखर कांबळे - उपाध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. विवेक पटवर्धन | श्री. माधव कान्हेरे | ॲड.श्री. बाळकृष्ण पंडीत | श्री. रमेश ओसवाल |
| श्री. महेश राजेमहाडीक | श्री. मकरंद मुळ्ये | श्री. काशिनाथ शेलार | श्री. प्रितम भुतकर |
| श्री. स्वप्निल जाधव | श्री. अशोक लोखंडे | श्री. चंद्रकांत गुजर | ॲड. सौ. सुनिती गोवित्रीकर |
| सौ. ज्योती गांधी | श्रीपाद कुलकर्णी (मुख्य कार्यकारी अधिकारी) | | श्री. चंद्रशेखर काळे (सरव्यवस्थापक) |

बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य : श्री. अविनाश जोशी । श्री. रामचंद्र कानडे । श्री. अनंत जोशी

■ उपसरव्यवस्थापक ■
श्री. संतोष बागुल

■ सहा. सरव्यवस्थापक ■
श्री. आनंद पटवर्धन (पुणे विभाग) । श्री. प्रसाद कुंभारे (गुंतवणूक विभाग) । श्री. सुहास पानसे (वाई विभाग)

Scanned with OKEN Scanner